# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# गडकिल्ल्यांचे संवर्धन करणार:मोहोळ

## सकल हिंदू समाजाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिरात हिंदू जनसंवाद मेळावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

'हिंदुत्व आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही. तसेच राज्यातील गडकोट आणि दुर्गांच्या संवर्धनाचे काम कर्तव्य भावनेतून करणार आहे', अशी ग्वाही महायुतीचे अधिकृत उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

सकल हिंदू समाजाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिरात हिंदू जनसंवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. यात २७ हिंदुत्ववादी संघटनांनी मोहोळ यांना पाठिंबा दिला. यात मोहोळ बोलत होते. विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी श्रीराम मंदिराचा संघर्ष मांडला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही. तसेच राज्यातील गडकोट आणि दुर्गांच्या संवर्धनाचे काम कर्तव्य भावनेतून मी करीन, असे आश्वासन महायुतीचे अधिकृत उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी दिले. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित हिंदू जनसंवाद मेळाव्यात मुरलीधर मोहोळ बोलत होते. पुणे शहरातील २७ हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने मुरलीधर मोहोळ यांच्या समर्थनार्थ हिंदू जनसंवाद मेळाव्याचे आयोजन बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात आले होते. या मेळाव्यात मोठ्या संख्येने तरुण आणि नागरिक उपस्थित होते.



मोहोळ म्हणाले, 'युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान्यता मिळण्यासाठी केंद्र सरकारकडून शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांचे नामांकन पाठविले आहे. रायगडासह साल्हेर किल्ला, शिवनेरी किल्ला, लोहगड, खांदेरी किल्ला, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा किल्ला, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तमिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा त्यात समावेश आहे. २०२४-२५ या वर्षासाठी केंद्र सरकारने मराठा लष्करी भूदृश्ये असा प्रस्ताव युनेस्कोकडे दिला आहे.'

या मेळाव्यात किशोर चव्हाण, पराग ठाकूर, दीपक नागपुरे, स्वप्नील नाईक, लोकेश कोंढरे, संजय भोसले, किशोर येनपुरे, श्रीकांत शिळीमकर, अनिकेत हरपुडे यांनी मोहोळ यांना पाठिंबा जाहीर करून मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन महेश पवळे यांनी केले.

### सामरिक लष्करी शक्तीचे दर्शन

» युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतील बहुतांश किल्ले सह्याद्रीच्या परिसरातील आहेत. सतराव्या ते एकोणिसाव्या शतकादरम्यान बांधलेल्या या किल्ल्यांच्या माध्यमातून मराठा राजवटीच्या सामरिक लष्करी शक्तीचे दर्शन होते. या आणि अशा अनेक किल्ल्यांच्या मदतीने शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. या किल्ल्यांचे जतन, संवर्धनाचे काम मी कर्तव्य भावनेतून करेन, अशी ग्वाही मोहोळ यांनी दिली.

---

# दरोडा विरोधी पथकाने केले पिस्तूल खरेदी-विक्रीचे रॅकेट उद्ध्वस्त

## पिंपरी-चिंचवड पोलिसांची मोठी कारवाई; 13 पिस्तूल आणि 13 काडतुसे जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऐन निवडणुकीच्या काळात पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दरोडा विरोधी पथकाने मोठी कारवाई करीत वेपन डीलरसह चौघांना अटक करून त्यांच्याकडून सात पिस्तूल आणि पाच काडतुसे जप्त केली आहेत. शस्त्रांची शहरात होणारी खरेदी-विक्रीला काही अंशी ब्रेक लागला आहे. अर्जुन भाऊराव सूर्यवंशी (वय २०, रा. आळंदी), तुषार नथुराम बच्चे (वय ३१, रा. शिवाजीवाडी, मोशी), कमल रामदास राठोड (वय २६, रा. नाणेकरवाडी, ता. खेड), अंकित भस्के अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

सहायक पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दरोडा विरोधी पथकातील पोलीस शिपाई गणेश सावंत, सुमित देवकर आणि विनोद वीर यांना मरकळ गाव येथे एक गुन्हेगार पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी अर्जुन सूर्यवंशी याला सापळा लावून ताब्यात घेत त्याच्याकडून दोन पिस्तुल आणि दोन काडतुसे जप्त केली. सूर्यवंशी याच्या विरोधात आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने वेपन डीलर अंकित भस्के याच्याकडून हे पिस्तूल विकत आणले असल्याचे सांगितले.



सूर्यवंशी याने भस्के याच्याकडून आणखी दोन पिस्तूल आणि काडतूस विकत घेऊन ते सराईत गुन्हेगार तुषार बच्चे याच्याकडे ठेवण्यास दिल्याचेही त्याने तपासात सांगितले. पोलिसांनी मोशी येथून बच्चे याला ताब्यात घेत त्याच्याकडून दोन पिस्तूल आणि एक काडतूस जप्त केले.

दरम्यान, वेपन डीलर असलेला अंकित भस्के याला अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर पोलिसांनी पिस्तूल बाळगल्या प्रकरणी अटक केली होती. तो न्यायालयीन कोठडीत असताना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी त्याला कारागृहातून ताब्यात घेतले. त्याच्याकडून आणखी दोन पिस्तूल आणि एक काडतूस पोलिसांनी जप्त केले.

अंकित याने आणखी एक पिस्तूल नाणेकरवाडी येथील कमल राठोड याला विकले होते. पोलिसांनी कमल राठोड याला अटक करून त्यांच्याकडून एक पिस्तूल आणि एक काडतूस जप्त केले. या कारवाईमध्ये दरोडा विरोधी पथकाने सात पिस्तूल आणि पाच काडतुसे जप्त केली आहेत.

### 13 पिस्तूल आणि 13 काडतुसे जप्त

» आरोपी अंकित भस्के हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर पिंपरी-चिंचवड आणि अहमदनगर येथे शरीराविरुद्धचे गुन्हे, अग्निशस्त्र बाळगणे, तस्करी करणे असे गुन्हे दाखल आहेत. अर्जुन सूर्यवंशी याच्या विरोधात खुनाचा प्रयत्न, मारामारीचे गुन्हे दाखल आहेत. तुषार बच्चे याच्या विरोधात देखील जमाव जमवून दहशत निर्माण करणे, अग्निशस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत. दरोडा विरोधी पथकाने चालू वर्षात पाच कारवायांमध्ये १३ पिस्तूल आणि १३ काडतुसे जप्त केली आहेत.

# शिरुर मतदार संघात भाजपाचा "मास्टर स्ट्रोक"

## आमदार महेश लांडगे यांचा महाविकास आघाडीला धक्का : गणेश कवडे यांचा भाजपा प्रवेश



**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने "मास्टर स्ट्रोक" मारला असून, मतदार संघातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र ओझर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश कवडे यांनी अधिकृतपणे भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.

भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या समन्वयाने आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गणेश कवडे यांनी हातात 'कमळ' घेतले. भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी फडणवीस यांची शिरुरमध्ये जाहीर सभा झाली. या सभेत कवडे यांनी भाजपाची पताका खांद्यावर घेतली.

याबाबत आमदार महेश लांडगे यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे श्रद्धास्थान श्रीक्षेत्र ओझर विघ्नेश्वर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष गणेश कवडे यांनी आज राज्याचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत अधिकृत प्रवेश केला आहे. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर विश्वास आणि केंद्र व राज्यातील महायुतीची विकासात्मक धोरणाला जनसामान्यांतून प्रतिसाद मिळत आहे.

शिरुर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा "श्रीगणेशा" निश्चितपणे महायुतीचे उमेदवारशिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासाठी शुभसंकेत ठरेल, असा विश्वास वाटतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी शिरुरमध्ये महायुतीचा उमेदवार विजयी करण्याचा निर्धार भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय आणि मित्र पक्ष महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे, असेही आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी आढळराव पाटलांचं कौतूकही केलं. ते म्हणाले की, महेश दादा असो किंवा आढळराव पाटील असो. त्यांनी बैलगाडी शर्यतीसाठी खुप प्रयत्न केलेत. अडीच वर्ष महाविकास आघाडीचं सरकार होतं. त्यावेळी काहीचं झालं नाही. त्यानंतर मी मुख्यमंत्री असतांना तो प्रश्न मार्गी लावला. सरकार आलं आणि बैलगाडी शर्यत सुरू केली. असं म्हणत शेतकऱ्यांना काय हवंय, सामान्य माणसाला काय हवंय हे जाणणारे आढळराव पाटील आहे. असेही फडणवीस म्हणाले.

जागावाटपात शिरूरची जागा राष्ट्रवादीच्या कोट्यात गेली. दुसऱ्या बाजूला एकनाथ शिंदेंच्या शिवसेने देखील आग्रह धरला. शेवटी मधला मार्ग मी काढला. जागा जरी राष्ट्रवादीला गेली तर उमेदवार म्हणून आपण आढळराव पाटलांना देऊ असं दोघांना सांगितलं. तिथे पक्ष बदलला नाही. आम्ही एका विचाराने सोबत आलो आहोत. याआधी पालघरमध्ये आम्ही ठाकरेंना उमेदवारही दिला आणि जागी ही दिला. त्यानंतर तो उमेदवार देखील आम्ही निवडून आणला. एका विचारात काम करत असतांना आम्ही पक्ष बदलला नाही. त्याठिकाणी आम्ही ठरवून केलं आहे. असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### आढळरावांच्या विजयासाठी भाजपा मैदानात...

**» शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात गणेश कवडे काम करीत होते. त्यांच्याकडे युवा सेनेचे राज्य समन्वयकपदाची जबाबदारी होती. जुन्नर तालुक्यातील युवा चेहरा आणि ठाकरे कुटुंबीयांचे निकटवर्ती अशी त्यांची ओळख आहे. तसेच, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. महायुतीच्या माध्यमातून शिवाजीराव आढळराव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 'घड्याळ' या चिन्हावर लढत आहेत. मात्र, "घड्याळाला मत म्हणजे मोदींना मत..." असा नारा देत भाजपा आढळरावांच्या विजयासाठी मैदानात उतरली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे 'कट्टर समर्थक' असलेल्या आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून गणेश कवडे यांचा पक्षप्रवेश निश्चित करण्यात आला. त्याद्वारे भाजपाने महाविकास आघाडीला धक्का दिला आहे. अष्टविनायक गणपतीपैकी ओझरचा विघ्नेश्वर, थेऊरचा चिंतामणी, लेण्याद्रीचा गिरिजात्मज आणि रांजणगावचा महागणपती ही तीर्थक्षेत्र शिरुर लोकसभा मतदार संघाअंतर्गत आहेत. पुणे जिल्ह्यातील शहरी-ग्रामीण भागासह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशभक्त आहेत. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक गणपतीपैकी विघ्नेश्वर गणपती देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून गणेश कवडे यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्याचा फायदा महायुतीला होईल, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे.**

# दत्ता भरणे यांच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

## शिवीगाळ प्रकरणी सुप्रिया सुळे यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली



**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि इंदापूरचे आमदार दत्ता भरणे यांचा एक व्हिडिओ शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शेअर केला होता. या व्हिडिओमध्ये दत्ता भरणे शिवीगाळ आणि धमकी देत असल्याचं पाहायला मिळालं होतं. याप्रकरणी आता दत्ता भरणे यांच्या विरोधात सुप्रिया सुळे यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

रोहित पवार यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर शेअर केलेला व्हिडिओ कधीचा आणि कुठला आहे, याबाबत नेमकं समजू शकलेलं नाही. मात्र, हा व्हिडिओ आजचा असून मतदारांना धमकावले जात असल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे. सुप्रिया सुळे यांनी निवडणूक आयोगाच्या व्हॉट्सअप क्रमांक आणि ई-मेल आयडीवर मेल करुन रितसर तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता भरणे यांनी सुप्रिया सुळे यांच्या कार्यकर्त्यांना शिवीगाळ केली आहे. सुप्रिया सुळे यांनी नाना गवळी यांची तात्काळ जाऊन भेट घेतली आहे. यावेळी गवळी म्हणालेत की, 'आमचे कार्यकर्ते बसले होते. त्यावेळी भरणे गाडीतून आले आणि त्यांनी शिवीगाळ सुरु केली. तुम्हाला माझ्याशिवाय कोणी नाही. तुम्हाला इथंच राहायचं आहे. आम्ही सुळे गटाचे असल्याने त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली.'

### व्हिडिओ रोहित पवारांकडून शेअर

**» व्हायरल व्हिडिओमध्ये दिसतंय की, 'राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे हे एका व्यक्तीशी भांडत आहेत. व्यक्तीला शिवीगाळ देखील केली जात आहे. तुम्हाला माझ्याशिवाय कोणी नाही. मलाच तुमच्या मदतीला यावं लागेल, अशाप्रकारची वक्तव्य ते करताना दिसत आहेत.' रोहित पवारांनी हा व्हिडिओ पोस्ट केलाय.**

दत्ता भरणे यांचे हे शिवीगाळ प्रकरण चांगलंच गाजण्याची शक्यता आहे. अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. विरोधकांकडून खोटे आरोप करण्यात आले आहे. समोरच्याच व्यक्तीने शिवीगाळ केली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून शिवीगाळ करावी लागली, असं ते म्हणाले आहेत. दरम्यान, आज राज्यात तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. राज्यातील ११ मतदारसंघात मतदान होत आहे. यात बारामती लोकसभा मतदारसंघाचा देखील समावेश आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील निकालाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष असणार आहे.

शरद पवार यांनी देखील इंदापूर येथील सभेत बोलताना दमदाटी करणाऱ्यांना जागा दाखवा असा इशारा दिला होता. त्यांनी थेट दत्ता मामा भरणे यांना इशारा दिला होता.

# पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणारे 'मुंगेरीलाल'च जास्त

## पाकिस्तान व काँग्रेसला वाटते की, मोदी पुन्हा पंतप्रधान होऊ नयेत : गुलाबराव पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होऊ नयेत, असे पाकिस्तान आणि काँग्रेसला वाटते. विरोधी इंडिया आघाडीत पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणारे 'मुंगेरीलाल'च अधिक आहेत, असा टोला शिवसेना नेते व राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी लगावला. कट्टर शिवसैनिकांनी वाढविलेल्या पक्षाचा संजय राऊत यांनी सत्यानाश केला, असा आरोपही त्यांनी केला.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी चिंचवडच्या चिंचवडे लॉन्स येथे खान्देशवासीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ते बोलत होते. व्यासपीठावर खासदार बारणे, रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, माजी सभागृह नेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे तसेच



बाळासाहेब भागवत, कुणाल वाव्हळकर, श्रीधर वाल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

गुलाबराव पाटील यांनी त्यांच्या खास शैलीत शेरोशायरी करीत विरोधकांवर तुफानी हल्ला चढवला. ते म्हणाले की, मोदी पंतप्रधान होऊ नयेत, असे फक्त पाकिस्तानला आणि देशातील भ्रष्टाचाऱ्यांना वाटते. पण देशातील सर्वसामान्य जनतेला मोदीच पुन्हा पंतप्रधान व्हावेत असे वाटते. त्यामुळे मोदींना दणादण मतदान करा, आडवा येईल त्याचा सत्यानाश होईल, ही मोदींची गॅरंटी आहे.

ज्यांच्याकडे 5-10 खासदारही नाहीत, ते इंडिया आघाडीतील नेतेही पंतप्रधान झाल्याचे 'मुंगेरीलाल के हसीन सपने' पहात आहेत, अशी खिल्ली गुलाबराव पाटील यांनी उडवली. आम्ही रक्ताचं पाणी करून, जीवावर उदार होऊन पक्ष वाढवला, पण ते विनाकारण आम्हालाच बदनाम करीत आहेत. गद्दार, गद्दार म्हणून हिणवत आहेत, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली. संजय राऊत यांनी पक्षाचा सत्यानाश केला, असा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसने कायम मतांचे राजकारण केले. भांडण लावून लोकांना येडं बनवलं. आता मोदींविषयी चुकीचे चित्र उभे करून मतदारांमध्ये भीती निर्माण करीत आहेत. पण हे आता चालणार नाही. मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षात झालेली देशाची प्रगती सर्वांनीच पाहिली आहे. त्यामुळे मोदी हेच पंतप्रधान होणार, हे खुद्द काँग्रेसवालेही मान्य करतात, असे ते म्हणाले.

### सहा तासांत 3 सभा आणि 250 कि.मी.चा प्रवास

» खासदार बारणे यांना गुलाबराव पाटील यांच्या सभेला येण्यासाठी सहा तासांत दोन मोठ्या सभा आणि सुमारे 250 किलोमीटरचा प्रवास, अशी कसरत करावी लागली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रहाटणी येथे सभा झाली. त्यानंतर खासदार बारणे त्यांच्यासमवेतच हेलिकॉप्टरने पनवेलच्या सभेला गेले व पनवेलची सभा झाल्यानंतर मोटारीने परत चिंचवडला आले. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आतापर्यंत आपण अनेक आंदोलने केली, केसेस अंगावर घेतल्या. त्याचबरोबर मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास केला. त्यामुळे मावळातील मतदार यावेळीही आपल्याला दिल्लीला पाठवेल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

श्रीरंग बारणे हे दिल्ली हलवून टाकणारे खासदार आहेत. विकास कामांसाठी त्यांनी राज्य शासनाकडे केलेला पाठपुरावा मी स्वतः पाहिला आहे. म्हणून त्यांच्यासाठी खान्देशवासीयांपुढे मतांची झोळी घेऊन आलो आहे, असे त्यांनी सांगितले. खान्देशातील मंडळी तुमच्या भरवशावर पिंपरी-चिंचवडमध्ये पोट भरण्यासाठी आली आहेत. त्यांना सुरक्षितपणे राहता आलं पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी बोलून दाखवली.

संसदेतील शिवसेना पक्षाचे नेते म्हणून खासदार बारणे यांनी केलेल्या कामगिरीची माहिती खासदार कृपाल तुमाने यांनी दिली. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याचे बारणे यांचे कसब वाखाणण्यासारखे आहे. पक्षाच्या अन्य खासदारांची कामे करून देण्यासाठी बारणे नेहमीच पुढाकार घेतात. त्यांचे दिल्ली दरबारी खूप वजन आहे. त्यामुळेच त्यांनी मतदारसंघालाही न्याय मिळवून दिला आहे, असे त्यांनी सांगितले.

# गोविंदा यांच्या 'रोड शो'ला पिंपरीत उत्स्फूर्त प्रतिसाद

## बारणे यांच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन गोविंदा यांच्या हस्ते

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन नामवंत अभिनेते गोविंदा यांच्या हस्ते आज (रविवारी) झाले. त्यानंतर पिंपरी कॅम्प व पिंपरी गावात गोविंदा यांनी 'रोड शो' करीत मतदारांना बारणे यांनाच मतदान करण्याचे आवाहन केले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे मध्यवर्ती कार्यालय पिंपरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागील इमारतीत सुरू करण्यात आले आहे. कार्यालयाच्या उद्घाटन



प्रसंगी खासदार बारणे, आमदार उमा खापरे, शिवसेना नेत्या शीतल म्हात्रे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, भाजपचे निवडणूक समन्वयक सदाशिव खाडे, शिवसेनेचे शहर प्रमुख निलेश तरस, माजी नगरसेवक संदीप वाघेरे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र तरस आदी प्रमुख पदाधिकारी व व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करावे

» पिंपरी कॅम्प मधून फिरून रॅलीची पिंपरी गावात सांगता झाली. गोविंदा यांना पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा चहात्यांनी गर्दी केली होती. गोविंदा यांनी हात उंचावून सर्वांना अभिवादन केले. श्रीरंग बारणे यांच्या धनुष्यबाण चिन्हापुढील बटन दाबून त्यांना तिसऱ्यांदा लोकसभेत पाठवावे व नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करावे, असे आवाहन गोविंदा यांनी केले.गोविंदा यांच्या 'रोड शो'मुळे पिंपरी भागात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापल्याचे पहायला मिळत होते.

गोविंदा यांनी संस्कृत मंत्र म्हणत खासदार बारणे यांना शुभेच्छा दिल्या. 'आप्पा बारणे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'होणार होणार, हॅटट्रिक होणार' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी एक जल्लोष केला. विजय रथावर आरूढ होऊन गोविंदा आणि खासदार बारणे यांनी जमलेल्या समुदायाला अभिवादन केले. दुचाकी घेऊन शेकडो युवक रॅलीमध्ये सहभागी झाले होते. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅली पुढे इंदिरा गांधी रेल्वे उड्डाणपुलावरून पिंपरी बाजारपेठेत गेली.

# पोलीस बंदोबस्तात पैशांचा पाऊसचा आरोप

## मतदानाच्या रात्री राडा, रोहित पवार आणि विरोधकांचा आरोपांना अजित पवार यांनी सडेतोड उत्तर दिले

**पुणे | प्रतिनिधी**

रोहित पवार आणि विरोधकांचा आरोपांना अजित पवार यांनी सडेतोड उत्तर दिले. निवडणूक आयोग, पोलिस यंत्रणा, स्कॉड, सर्वच जण काम करत आहेत. अशा प्रकारांवर त्यांच्याकडून कारवाई केली जाते. विरोधकांकडून चुकीचे आरोप केले जात आहेत.

लोकसभा निवडणुकीत राज्यातील ११ जागांवर मतदान होत आहे. मतदानाच्या रात्री कुठे पैसे वाटप झाल्याचा आरोप केला जात आहे. धाराशिव आणि बारामती लोकसभा मतदार संघात मध्यरात्रीपासून आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत. यासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी रात्रीच ट्विट केले. तसेच पैसे काढण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत बँक सुरु असल्याचा आरोप केला. दरम्यान या आरोपांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोरदार उत्तर दिले. तो त्यांचाच माणूस असू शकतो. त्यांच्या माणसाला पाठवून ते असे करु शकतात, असे उत्तर अजित पवार यांनी दिले. सकाळी पुन्हा माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, किती पैसा वाटला तरी जनता आमच्या सोबत आहे. अडीच हजारांपासून पाच हजारांपर्यंत पैसे वाटप केले जात आहे. त्यासाठी बँक रात्री सुरु होती. आता ही लढाई धनशक्तीविरुद्ध जनशक्ती अशी झाली आहे.

धाराशिव लोकसभा मतदार संघातही पैसे व दारूच्या बाटल्या वाटल्याचा आरोप झाला आहे. पोलिसांनी गाडी, दारू व पैसे जप्त केले आहेत. तसेच पंचनामा करत जबाब घेतले आहे. महायुतीच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना मतदान करण्यासाठी 500 रुपये व दारू वाटप झाल्याचा आरोप झाला आहे. भाजपचा खरोसा गावातील माजी सरपंच प्रशांत डोके व त्यांच्या चालक राहुल डोके यांच्यावर हे आरोप झाले आहेत. गावातील नागरिकांनी त्यांना पकडले मात्र त्यानंतर भितीने दोघे ही फरार झाले.



### अजित पवार यांनी दिले जोरदार उत्तर

» रोहित पवार आणि विरोधकांचा आरोपांना अजित पवार यांनी सडेतोड उत्तर दिले. निवडणूक आयोग, पोलिस यंत्रणा, स्कॉड, सर्वच जण काम करत आहेत. अशा प्रकारांवर त्यांच्याकडून कारवाई केली जाते. विरोधकांकडून चुकीचे आरोप केले जात आहेत. रात्री बँक उघडी असल्याचे म्हणतात, पण तुम्ही स्वत: बँक उघडी बघितली का? ते फोटो कधीचे आहेत? प्रत्येक बँकेबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे असतात. ते तुम्ही चेक करु शकतात. आरोप करणाऱ्यावर व्यक्तीवर परिणाम झाला आहे. त्यांच्या प्रश्नावर उत्तर देण्याची मला गरज वाटत नाही. उलट त्यांच्याच व्यक्तीला पैसे वाटण्यासाठी उभे करुन आमचे नाव घेतले जाऊ शकते, असे अजित पवार यांनी म्हटले.

### रोहित पवार यांचा काय आहे आरोप

» रोहित पवार यांनी रात्री पहिले ट्विट केले. पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वेल्हे शाखेतील घड्याळ बहुतेक बंद पडलंय. आता रात्रीचे 12 वाजले तरी बँक सुरू आहे. कदाचित उद्या मतदानामुळे आज रात्रभर ओव्हर टाईम सुरू असावा. त्यानंतर रोहित पवार यांनी दुसरे ट्विट केले. बारामती मतदारसंघात चक्क पोलिस 'बंदोबस्तात' पडतोय पैशांचा पाऊस. यासंदर्भात भोर तालुक्यातील काही व्हिडिओ शेअर करतोय. यामध्ये भोर तालुक्यातील 'अजितदादा मित्रमंडळा'चा पदाधिकारी आणि मावळमधील एका नेत्याचे कार्यकर्तेही दिसता आहेत, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

# गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदानासाठी प्रोत्साहित करावे

## जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्राद्वारे आवाहन केले

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण सोसायट्या असून तेथील मतदारांची संख्या अधिक आहे. शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने रहिवासी सोसायट्यांमध्ये पदाधिकाऱ्यांनी विविध उपक्रम राबवत सभासदांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पत्राद्वारे केले आहे.

जिल्ह्यातील पुणे, शिरुर व मावळ लोकसभा मतदार संघात येत्या 13 मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवी यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रमांद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मतदान जागृतीसाठी सोसायट्यांनी पुढाकार घ्यावा. सभासदांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी प्रत्येक गृहनिर्माण संस्थांनी विशेष सभा बोलावून सभासदांना मतदानाचे आवाहन करावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

दुपारपर्यंत मतदान न केलेल्या सभासदांच्या भेटी घेऊन मतदान करण्याबाबत प्रेरित करावे, मतदान केलेले सभासद व नवमतदारांना गुलाबपुष्प अथवा भेट वस्तू देऊन सोसायटीमधील विशेष सोहळ्यात गौरविण्यात यावे, असे आवाहनही डॉ. दिवसे यांनी केले आहे.

मतदारांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने, पुणे जिल्ह्याने सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्र सुरू केले असून, देशातील अशा प्रकारच्या उपक्रमाची ही पहिलीच घटना आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी ही महत्त्वाची संकल्पना जाहीर करताना पुणे शहरातील 35 गृहनिर्माण सोसायट्यांना मतदान केंद्रे म्हणून नियुक्त करण्यात आल्याची माहिती दिली.

हा अभिनव दृष्टीकोन मतदान केंद्रांना रहिवाशांच्या जवळ आणून, विशेषतः शहरी भागात कमी मतदानाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतो. हा उपक्रम राबविण्याच्या निर्णयाची सुरुवात पुणे जिल्ह्यात झाली आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान नागरी सहभाग वाढवण्याच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे.

आगामी निवडणुकीची तयारी सुरू असताना जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीचे वेळापत्रक निश्चित झाले आहे. प्रमुख तारखांमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघासाठी 12 एप्रिल रोजी अधिसूचना जारी करणे, नामनिर्देशनपत्र भरण्याची अंतिम तारीख 19 एप्रिल, 2024 आहे. पुणे, शिरूर आणि मावळ मतदारसंघासाठी तत्सम टाइमलाइन स्थापित करण्यात आल्या आहेत.



### जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांचे आवाहन

» मतदानाच्या तारखेचा उल्लेख असलेली निवडणूक विषयक भित्तीपत्रके संस्थेच्या दर्शनी भागात लावावीत, सभासदांना मतदार यादीत नाव शोधून देणे, मतदार ओळख चिठ्ठी पोहोचविण्यास केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना मदत करावी. पात्र मतदारांची यादी तयार करुन मतदानाच्या दिवशी सकाळपासून मतदान केलेल्या मतदारांची नोंद घ्यावी, वृद्ध व दिव्यांग सभासदांसाठी मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी शक्य असल्यास वाहनाची व्यवस्था करावी,